आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – ०८/०६/२०२४ वार – शनिवार

पुणे आणि परिसरात आता जोरदार वाऱ्यासह पावसाच्या अतिशय मुसळधार सरी पडत आहेत. कमाल तापमानात लक्षणीय घट झाली आहे. उद्याही असंच हवामान राहण्याचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

पुणे शहराच्या विविध भागात होत असलेल्या मुसळधार वृष्टीमुळं रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साठणं, वाहतुकीची कोंडी, या समस्यांसोबत अचानक पाण्याचे लोंढे येऊन नागरिकांच्या घरात पाणी शिरुन मालमत्तेचंही मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. शहरातील अनिर्बंध आणि बेकायदेशीर बांधकामामुळं पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बंद होत असून त्यामुळंच पावसाचं पाणी साचून राहण्याच्या घटना वारंवार घडत असल्याचं निष्कर्ष तज्ज्ञांनी काढला आहे. विविध विकास कामांच्या नावाखाली रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. गटारात राडारोडा पडला असल्यानं सांडपाणी वाहून जाण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

पुणे शहरातील कळस, धानोरी, या भागात मंगळवारी ढगफुटीसदृश पाऊस झाला. त्यामुळं इथल्या नाल्यांची आणि पावसाळी वाहिन्यांची पुणे महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले पाहणी केली. यावेळी अरूंद नाल्यांची खोली वाढवणं आणि कल्व्हर्ट स्वच्छ करण्याचे आदेश आयुक्तांनी संबंधितांना दिले.

पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात विविध पदांवर कार्यरत असणारे अनेक कर्मचारी, अधिकारी गणवेषाशिवाय कामावर येत असल्याचं निदर्शनास आलं आहे. राज्य पोलीस दलातील विशेष शाखा आणि गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचारी, अधिकारी वगळता उर्वरित सर्व कर्मचाऱ्यांनी कामावर असताना गणवेष परिधान करणं अनिवार्य असल्याचे स्पष्ट निर्देश पोलीस महासंचालक कार्यालयाकडून देण्यात आले आहेत.

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांच्या ठिकाणी सर्व आवश्यक ती कामं करण्याचे आणि पालखी मार्गावरील अतिक्रमणं काढण्याचेही आदेश पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी दिले आहेत. पालख्यांचं आगमन पुणे शहरात ३० जून रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी पालखी मार्गांची पाहणी केली.

पावसाळ्यात कीटक तसंच विषाणूजन्य आजारांचंही प्रमाण वाढतं. त्यापासून रक्षण करण्यासाठी आपल्या घरी आणि घराभोवती पाणी साचू देऊ नका. पिण्याचं पाणी गाळून, उकळून थंड करून प्या, घरात डासांची उत्पत्ती होऊ देऊ नका, त्यासाठी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा असा सल्ला पुणे महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉक्टर सूर्यकांत देवकर यांनी दिला आहे.

पुणे-लोणावळा रेल्वे मार्गावर तळेगाव ते कामशेत दरम्यान उद्या रविवारी दुरुस्तीचं काम करण्यात येणार असल्यानं पुणे लोणावळा दरम्यान लोकलच्या १० फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत; तर काही गाड्या उशिरानं धावणार असल्याची माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे.

'सक्षम म्हणजेच समदृष्टी, क्षमताविकास आणि संशोधन मंडळ या दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी वाहिलेल्या राष्ट्रीय संस्थेच्या त्रैवार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाचं उद्घाटन आज पुण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाले यांच्या हस्ते करण्यात आलं. पुण्यातील महर्षी कर्वे संस्थेत दोन दिवस हे अधिवेशन सुरू राहणार आहे. समाजानं दिव्यांग व्यक्तीमध्ये काय नाही, यापेक्षा काय आहे याचा विचार करून त्यांना प्रोत्साहन दिल्यास ते देशासाठी मोठे योगदान देऊ शकतील, असं प्रतिपादन होसबाळे यांनी केलं. या अधिवेशनाला देशभरातून ५०० जिल्ह्यातील १५०० प्रतिनिधी उपस्थित आहेत.

विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी नटलेल्या ‘भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी महोत्सवाचं उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते करण्यात आलं. अकादमीच्या वर्धापनदिनानिमित्त या दोन दिवसीय महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

पर्यावरण दिनानिमित्त ग्रीन हिल्स समूहानं पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात 'पुण्यातील प्रदूषणावरील उपाय" या प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. आजपासून तीन दिवस हे प्रदर्शन खुले असेल. ग्रीन हिल्स समूहानं पुण्यातील अनेक टेकड्या हिरव्यागार करण्यात मोठा हातभार लावला आहे.

पुणे तसंच पिंपरी चिंचवड शहरामध्ये अतिसाराच्या रुग्णांचे उपचार आणि दक्षता याबाबत जनजागृती व्हावी यासाठी 6 ते 21 जून या कालावधीत “विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा” राबविण्यात येत आहे. शहरातील झोपडपट्टी भागात आशा स्वयंसेविकांमार्फत पाच वर्षापर्यंतची बालकं असलेल्या घरांना भेट देऊन अतिसाराबाबत माहिती आणि आवश्यक ती वैद्यकीय मदत देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाने विविध उत्पन्न गटांसाठी पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्हयांमधून चार हजार ८७७ सदनिकांसाठी 47 हजारांहून अधिक सशुल्क अर्ज आले आहेत. सोडत 26 जून रोजी जाहीर होईल.

वन्य प्राणीविषयक गुन्ह्यांच्या तपासासाठी पुणे वनविभाग आता प्रशिक्षित श्वान पथकांची मदत घेणार आहे. राज्यातील अशा प्रकारचा पहिलाच प्रयोग ठरणार आहे. या पथकामध्ये विदेशी प्रजातीच्या ५ आणि देशी प्रजातीच्या एका श्वानाचा समावेश राहणार असून त्यांच्या प्रशिक्षणासाठी किमान दोन वर्षे लागतील. बिबट्या, खवलेमांजर आणि अन्य दुर्मीळ प्राण्यांचा माग काढण्याचं विशेष प्रशिक्षण या श्वानांना देण्यात येणार आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.